# लेखन प्रेरणा दिन अहवाल

दिनांक : ०१/०८/२०२६

आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, आष्टा येथील मराठी विभागाच्या वतीने साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त "लेखन प्रेरणा दिन" उत्साहात साजरा करण्यात आला.

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे हे मराठी भाषेतील नामवंत लेखक, लोकशाहीर आणि समाजप्रबोधनकार होते. आपल्या लेखनातून त्यांनी मराठी साहित्यविश्व समृद्ध केले तसेच तळागाळातील, वंचित आणि श्रमिक समाजाच्या जीवनातील वास्तव प्रभावीपणे मांडले. त्यांच्या साहित्यामुळे सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा मिळाली असून आजही त्यांचे साहित्य समाजाला नवी दिशा देणारे आहे.

या महान साहित्यिकांच्या विचारांचा परिचय विद्यार्थ्यांना व्हावा आणि त्यांच्यामध्ये लेखनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने मराठी विभागाच्या वतीने 'परिमल' या भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. या भित्तीपत्रकावर विद्यार्थ्यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनावर, साहित्यावर, सामाजिक कार्यावर तसेच त्यांच्या विचारांवर लेख, कविता आणि इतर साहित्यप्रकारांचे लेखन केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते माननीय प्राध्यापक डी एम आणि यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी मत व्यक्त करताना म्हणाले की," अण्णा भाऊ साठे यांनी दिड दिवसाचे शिक्षण घेतले . त्यांनी उपेक्षित, दलित , कष्टकरी, शोषित माणसांचे जग आपल्या साहित्यातून आविष्कृत केले." त्यांच्या साहित्यातून आजही समता बंधुता स्वाभिमान आणि माणुसकीची प्रेरणा देते.

या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून माननीय प्रा. डी. ए. माने, कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्री. विराज शिंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. अरुण पाटील, मराठी विभाग प्रमुख डॉ. डी. जे. दमामे, प्रा. भीमसेन आवटे, प्रा. रूपाली निकम, इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भीमसेन आवटे यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रा. रूपाली निकम यांनी केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

PRINCIPAL,
Arts, Commerce & Science College
ASHTA, Dist. Sangli.

**लेखन प्रेरणा दिन**

दिनांक : ०१/०८/२०२६




**प्रमुख वक्ते- मा. प्रा. डी. ए. माने**

**कार्यक्रमाचे अध्यक्ष - मा. श्री. विराज शिंदे**

**महाविद्यालयाचे प्राचार्य - डॉ. अरुण पाटील**